# तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव.

## नियामक मंडळाची ७वी बैठक दिनांक २३/३/२०००.

### बैठकीस उपस्थित माननीय सदस्य.

१). **मा. डॉ. पद्मसिंह पाटील,**
मा. मंत्री(पाटबंधारे) व अध्यक्ष,
मंत्रालय,मुंबई-३२.

२). **मा.श्री. बाळासाहेब थोरात,**
मा. राज्यमंत्री(पाटबंधारे) व उपाअध्यक्ष,
मंत्रालय,मुंबई-३२.

३). **मा. ए.एल.बोंगीरवार,**
मुख्य सचिव व पदसिध्द उपाध्यक्ष
मंत्रालय,मुंबई-३२.

४). **मा.श्री. आर.बी. बुध्दीराजा,**
प्रधान सचिव (वित्त) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

५). **मा.श्री. विनय बन्सल,**
प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

मा.ह. पंडित, उप सचिव, नियोजन विभाग
प्र. सचिव (नि) यांचे प्रतिनिधी

६). **मा.श्री. ए.पी. सिन्हा,**
प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

७). **मा.श्री. सतीश त्रिपाठी,**
प्रधान सचिव (वने) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

८). **मा.श्री. शिवाजीराव देशमुख,**
सचिव (कृषी) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

९). **मा.श्री. श्री. य. शुक्ल,**
सचिव (पाटबंधारे) व व्यवस्थापकीय संचालक,
मंत्रालय,मुंबई-३२.

23/3/2000

१०). **मा.श्री. ए. बी. महेंद्रकर,**
सचिव (लाक्षेवि) व सदस्य,
मंत्रालय,मुंबई-३२.

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

## नियामक मंडळाची सातवी बैठक, दिनांक 23/3/2000

## बैठकीचे कार्यवृत्त

तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची सातवी बैठक दिनांक 23/3/2000 रोजी संध्याकाळी 4:00 वाजता मा.मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण विकास महामंडळ वगळून) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे विधान भवनाच्या कामकाज समितीच्या सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील पदसिद्ध सदस्य व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | श्री.श्री.य.शुक्ल | : | सचिव (पाटबंधारे) व व्यवस्थापकीय संचालक |
| 2) | सौ.मा.हे.पंडित | : | उपसचिव, नियोजन विभाग, प्रधान सचिव (नियोजन) यांचे प्रतिनिधी |
| 3) | श्री.मु.खं.कुलकर्णी | : | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |
| 4) | श्री.प्र.वि.पाटील | : | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव (निमंत्रित) |
| 5) | श्री.सा.ज.काद्री | : | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव (निमंत्रित) |

मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात झाली. बैठकीच्या विषयसुचीचे विषयवार वाचन कार्यकारी संचालक यांनी केले. बैठकीत झालेल्या चर्चेचे व बैठकीचे कार्यवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

(पद्मसिंह पाटील)
मंत्री (पा) व अध्यक्ष

(मु.खं.कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.1 :- नियामक मंडळाच्या दिनांक 5 जुलै, 1999 च्या सहाव्या बैठकीचे ठराव वाचून कायम करणे.**

नियामक मंडळाच्या दिनांक 5 जुलै, 1999 रोजी झालेल्या सहाव्या बैठकीतील पारित ठराव वाचून कायम करण्यांत आले व त्यानुसार प्रस्तावित ठराव 7/1 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.2 :- महामंडळाच्या सन 2000-2001 या वर्षाच्या आर्थिक विवरणपत्रास मान्यता देणे.**

कार्यकारी संचालक यांनी सन 2000-2001 या वर्षाच्या आर्थिक विवरणपत्राची थोडक्यात माहिती दिली व या विवरणपत्रास मान्यता दिल्यास शासनाकडे अनुदान व कर्जरोखे उभारणीसाठी अनुमती मिळविण्याच्या दृष्टीने सुलभ होईल असे प्रतिपादन केले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/2 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.3 :- महामंडळाच्या अध्यादेशातील कलम 18(म) नुसार 56 उपसा सिंचन योजना ताब्यांत घेण्याबाबत.**

सदर विषयी चर्चा करतांना मा.अध्यक्ष यांनी महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे या आर्थिक वर्षात सदर 56 उपसा सिंचन योजना हस्तांतरित करुन घेता येणार नाहीत असे सांगितले व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/3 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.4 :- महामंडळाच्या आराखड्यात तरतूद नसलेल्या पुरसंरक्षक कामांना शासनाकडून स्वतंत्र अनुदान प्राप्त झाल्यास, ही कामे महामंडळामार्फत करण्यास मान्यता देणे.**

सदर विषयी चर्चा करतांना कार्यकारी संचालक यांनी महामंडळाच्या कक्षेत पूर नियंत्रण कामे येतात त्यामध्ये पूरसंरक्षक कामांची तरतूद नाही. त्यामुळे अशी कामे करावयाची झालयास त्यासाठी शासनाकडून स्वतंत्र अनुदान प्राप्त होणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/4 पारित करण्यांत आला.

| | |
|---|---|
| (पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**<u>विषय क्र.5</u> :- महामंडळाच्या आराखड्यात पूर्ण झालेल्या मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी आर्थिक तरतूद करणे.**

सदर विषयी चर्चा करतांना सचिव (पा) यांनी बांधकामाधीन प्रकल्पाशिवाय देखभाल दुरुस्तीच्या कामांचादेखील समावेश महामंडळाच्या उद्दीष्टात करावा व 10 वर्षातील वर्षवार तरतूद मान्य व्हावी असे सांगितले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/5 पारित करण्यांत आला.

**<u>विषय क्र.6</u> :- 250 हे. सिंचन क्षमतेपेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या व अध्यादेशात समाविष्ट नसलेल्या उपसा सिंचन योजना ताब्यांत घेण्याबाबत.**

सदर विषयावर चर्चा करतांना मा.अध्यक्ष यांनी महामंडळाची आर्थिक स्थिती पाहता सदर 56 उपसा सिंचन योजनांव्यतिरिक्त, 250 हे. सिंचन क्षमतेपेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या एकाही योजनेचा विचार करता येणार नाही असे सांगितले व त्यानुसार ठराव 7/6 पारित करण्यांत आला.

**<u>विषय क्र.7</u> :- अन्विक्षा नि प्रात्यक्षिक केंद्र, भडगांव हे कार्यालय कृषि विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनास सादर करावयाच्या प्रस्तावास मान्यता देणे.**

सदर विषयी चर्चा करतांना कार्यकारी संचालक यांनी अन्विक्षा नि प्रात्यक्षिक केंद्र, भडगांव हे कार्यालय महामंडळास आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नसलेमुळे तसेच त्यापासून काही विशिष्ट उद्देश साध्य होत नसल्याने कृषि खात्याकडे आस्थापनेसह, मत्ता व दायित्वासह वर्ग करणेचा प्रस्ताव शासनाकडे शिफारशीसह सादर करणे आवश्यक असल्याबाबत नियामक मंडळास विनंती केली, त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/7 पारित करण्यांत आला.

**<u>विषय क्र.8</u> :- जामदा डावा व उजव्या कालव्यावरील बागाईतदारांची सन 1985-85 या वर्षाची पाणीपट्टी माफ होणेबाबत.**

वरील विषयी चर्चा करतांना मा.अध्यक्ष यांनी, सन 1985-86 च्या कालावधीत पाणी दिले नाही मग आकारणी कां केली ? अशी विचारणा केली, त्यावर ब्लॉकच्या

| | |
|---|---|
| (पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

नियमानुसार पाणी आकारणी करावी लागते असे सांगण्यांत आले. वरील कालावधीत जामदा डावा व उजव्या कालव्यावरील बागाईतदारांची 1985-86 या वर्षाची 3,31,128/- एवढी पाणीपट्टी माफ करावी व ज्यांनी पाणीपट्टी भरली त्यांना सूट देण्यांत यावी (रु.60,496/-), असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले व त्यानुसार सर्वानुमते ठराव 7/8 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.9 :- निम्न तापी प्रकल्पाच्या उपविभागीय कार्यालयासाठी व निवासस्थाने बांधण्याकरिता जागा उपलब्ध करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देणे.**

निम्नतापी प्रकल्पाच्या उपविभागीय कार्यालयासाठी व कर्मचा-यांसाठी निवासस्थाने बांधण्याकरिता मौजे कळमसरे येथे जागा उपलब्ध करणेबाबतच्या चर्चेत मा.अध्यक्ष यांनी सदर प्रस्तावास सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/9 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.10 :- रिमोट सेंसिंगद्वारा हतनूर प्रकल्पावरील बारमाही पिक सर्वेक्षण करणेबाबत मान्यता देणे.**

सदर विषयावर चर्चा करतांना मा.अध्यक्ष यांनी रिमोट सेंसिंगचा खर्च हा त्यापासून मिळणा-या फायद्याशी प्रमाणशीर दिसून येत नाही, तसेच एका वर्षी सर्वेक्षण केल्यानंतर पुन्हा दरवर्षी सर्वेक्षण करावे लागेल त्यामुळे ही बाब परवडण्यासारखी नाही, असे सांगितले. तसेच याबाबत तपशीलवार योजना काय आहे ? याबाबत रिमोट सेसिंगच्या लोकांशी चर्चा करुन अभ्यास करावा व पुढील बैठकीत सदर विषय पुन्हा विचारार्थ मांडावा अशा सूचना दिल्या व त्यानुसार प्रस्तावित ठराव 7/10 वगळण्यांत आला.

**विषय क्र.11 :- कर्जरोखे मालीका-4 अन्वये रु.400 कोटीचे कर्जरोखे जून-2000 मध्ये उभारण्यास मान्यता देणे.**

कर्जरोखे मालीका-4 अन्वये 400 कोटी रुपयांचे कर्जरोखे जून-2000 मध्ये उभारण्याविषयी कार्यकारी संचालक यांनी मांडलेल्या प्रस्तावास मा.अध्यक्ष यांनी

| | |
|---|---|
| **( पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/11 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.12 :- अध्यादेशातील अनुसूची क्र.33 वरील उपसा सिंचन योजनेचे नांव ''दिपीमाई'' ऐवजी ''तापीमाई'' करणेबाबत.**

सदर विषयी महामंडळ कलम 18(म) नुसार अध्यादेशासोबत जोडलेल्या उपसा सिंचन योजनांच्या अनुसूचीमधील अ.क्र.33 वरील योजनेचे नांव चुकीने तापीमाई ऐवजी दिपीमाई छापले गेल्यामुळे आवश्यक दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा लागेल असे कार्यकारी संचालक यांनी सांगितले त्यास मा.अध्यक्षांसह सर्वांनी सहमती दर्शविली व त्यानुसार प्रस्तावित ठराव 7/12 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.13 :- महामंडळाच्या 1/1/98 ते 31/3/99 या कालावधीच्या ताळेबंदास मान्यता देणे.**

कार्यकारी संचालक यांनी सादर केलेल्या 1/1/98 ते 31/3/99 या कालावधीच्या ताळेबंदास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली, व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/13 पारित करण्यांत आला.

**विषय क्र.14 :- लघु पाटबंधारे प्रकल्पातून पिण्याचे पाणी आरक्षणासाठी मान्यता देणे.**

लघु पाटबंधारे प्रकल्पातून पाणी आरक्षण करण्याबाबतच्या विषयी चर्चा करतांना मा.अध्यक्ष यांनी पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्यक्रम असल्यामुळे लघु पाटबंधारे प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण करावे लागेल असे सांगितले व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव 7/4(अ) व (ब) पारित करण्यांत आला.

**विषय क्र.15 :- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील दंडणीय दराने येणा-या पाणीपट्टी आकारणीच्या थकबाकीबाबत व करारनामा करणेबाबत निर्णय घेणे.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील दंडणीय दराने येणा-या पाणीपट्टी आकारणीच्या थकबाकीबाबत व करारनामे करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करतांना

| | |
|---|---|
| **( पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

मा.अध्यक्ष यांनी दंडणीय आकारणी करावी काय ? असे विचारले असता सचिव (पा) यांनी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ थकबाकी भरत नाही व करारनामा करीत नाही असे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करारनामा कां करीत नाही अशी विचारणा केली. त्यावर सचिव (पा) यांनी थकबाकीमुळे करारनामा होऊ शकत नाही, असे सांगितले. त्यामुळे दुप्पट, तिप्पट आकारणी करावी लागते असे त्यांनी सांगितले. करारनामा न केलेला कालावधी किती वर्षाचा आहे असे मा.अध्यक्ष यांनी विचारले त्यावर हा कालावधी दोन वर्षाचा असल्याचे सांगण्यांत आले. मा.अध्यक्ष यांनी एकपटीने आकारणी करुन करारनामा करुन घ्यावा अशा सूचना दिल्या. व त्यानुसार सर्वानुमते ठराव 7/15 पारित करण्यांत आला.

**<u>विषय क्र.16</u> :- आयत्या वेळचे विषय :- लघु पाटबंधारे योजनांच्या प्रलंबित सु.प्र.मा. प्रस्तावातील प्रकल्पांवर प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा 25 टक्के इतका जास्त खर्च करणेस मान्यता देणे.**

आयत्या वेळच्या विषयामध्ये कार्यकारी संचालक व सचिव (पा) यांनी महामंडळांतर्गत ब-याचशा लघु प्रकल्पांवरील अपेक्षित खर्च प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा जास्त होणार असल्याने सदर प्रकल्पांची कामे सध्या बंद आहेत असे निदर्शनास आणले. त्यावर मा.अध्यक्ष यांनी ज्या प्रकल्पांची घळभरणी या वर्षी (जून-2000 पर्यंत) करावयाची आहे आणि प्रकल्प मापदंडात बसत आहेत अशा प्रकल्पांवर प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा 25 टक्के पर्यंत इतका जास्त खर्च करण्यांत अनुमती दिली, व त्यानुसार सर्वानुमते ठराव 7/16 पारित करण्यांत आला.

| | |
|---|---|
| [signature] | [signature] |
| **( पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

## नियामक मंडळाची सातवी बैठक, दिनांक 23/3/2000

## बैठकीत मान्य झालेले ठराव

**ठराव क्र.7/1 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``नियामक मंडळाच्या सहाव्या बैठकीत पारित झालेले ठराव वाचून कायम करण्यांत येत आहेत.``

**ठराव क्र.7/2 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या सन 2000-2001 च्या एकूण रु.662.94 कोटी खर्चाच्या सर्वसाधारण आर्थिक विवरणपत्रास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/3 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती पाहता या आर्थिक वर्षात (सन 2000-2001) महामंडळाच्या अध्यादेशात समाविष्ट असलेल्या 56 उपसा सिंचन योजना हस्तांतरीत करुन घेणेत येऊ नयेत.``

**ठराव क्र.7/4 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``पूर संरक्षक कामांची महामंडळाच्या 4676 कोटी रुपये किंमतीच्या आराखडयात तरतूद नसल्यामुळे अशी कामे करावयाची झाल्यास त्यासाठी शासनाकडून स्वतंत्र अनुदान प्राप्त व्हावे व या अनुषंगाने शासनाकडे आवश्यक निधीची मागणी करण्यांत यावी, ह्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/5 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळांतर्गत पूर्ण झालेल्या, तसेच 10 वर्षात पूर्ण होणा-या मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांवरील देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी खाली दर्शविल्याप्रमाणे वार्षिक आर्थिक तरतूद करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.``

**( पद्मसिंह पाटील)**
मंत्री (पा) व अध्यक्ष

**(मु.खं.कुलकर्णी)**
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

| वर्ष | | रक्कम रुपये कोटीत |
|---|---|---|
| 1997-98 | : | 1.17 |
| 1998-99 | : | 5.47 |
| 1999-2000 | : | 6.83 |
| 2000-2001 | : | 9.86 |
| 2001-2002 | : | 15.99 |
| 2002-2003 | : | 21.31 |
| 2003-2004 | : | 28.64 |
| 2004-2005 | : | 36.80 |
| 2005-2006 | : | 47.33 |
| 2006-2007 | : | 53.84 |
| **एकूण** | : | **227.24** |

**ठराव क्र.7/6 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळाची आर्थिक स्थिती पाहता, महामंडळाच्या अध्यादेशात समाविष्ट नसलेल्या व 250 हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षेत्र असलेल्या उपसा सिंचन योजना ताब्यांत घेता येणार नाहीत, ह्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/7 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``अन्विक्षा व प्रात्यक्षिक केंद्र, भडगांव (टी.सी.डी.फार्म, भडगांव) जि.जळगांव हे कार्यालय महामंडळाकडून कृषि विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनास शिफारस करणेस नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/8 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळांतर्गत असलेल्या जामदा डावा व उजवा कालव्यावरील बागाईतदारांची सन 1985-86 या वर्षाची रु.3,31,128/- एवढी

( पद्मसिंह पाटील)
मंत्री (पा) व अध्यक्ष

(मु.ख.कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

पाणीपट्टी माफ करण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे, तसेच ज्या खातेदारांनी पाणीपट्टी भरलेली होती, त्यांची रक्कम परत न करता ती पुढच्या वसुलीतून समायोजित करण्यांत यावी.``

**ठराव क्र.7/9 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``निम्न तापी प्रकल्पाच्या उपविभागीय कार्यालयासाठी व कर्मचारी वर्गासाठी निवासस्थाने बांधण्याकरिता मौजे कळमसरे ता.अमळनेर येथील खाजगी जमिन उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव विहित नमुन्यात, शासनास सादर करण्यास नियमक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/10 :-**

सदर विषय वगळण्यांत आला त्यामुळे ठराव पारित झाला नाही.

**ठराव क्र.7/11 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``कर्जरोखे मालीका-4 द्वारा रु.400 कोटीचे कर्जरोखे जून-2000 मध्ये उभारण्यास तसेच उद्दीष्टापेक्षा जास्त रक्कम प्राप्त झाल्यास महामंडळाकडेच ठेवण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/12 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळ अधिनियम 18(म) नुसार अध्यादेशासोबत जोडलेल्या उपसा सिंचन योजनांच्या अनुसूचीमधील अ.क्र.33 वरील योजनेच्या नांवात `दिपीमाई´ ऐवजी `तापीमाई´ अशी दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/13 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महामंडळाच्या 1/1/1998 ते 31/3/1999 या कालावधीच्या ताळेबंदास मान्यता देण्यांत येत असून महामंडळाच्या अधिनियम कलम क्र.47(4) नुसार आगामी विधीमंडळाच्या पटलावर सदर ताळेबंद मांडण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

| | |
|---|---|
| (पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**ठराव क्र.7/14 :-**

(अ) ठराव करण्यांत येतो की, ``लघु पाटबंधारे प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी उद्भव म्हणून गृहीत धरण्यास व पाणी आरक्षणास सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या 15 टक्केच्या आतील पाणी आरक्षणाच्या 10 योजनांना नियामक मंडळाची कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच 15 टक्के ते 25 टक्के मधील एका योजनेस नियामक मंडळाची पाणी आरक्षणास मान्यता देण्यांत येत आहे व 25 टक्केवरील पाणी आरक्षणाचे दोन प्रस्ताव मंजुरीसाठी प्रचलित नियमानुसार शासनास सादर करण्यांस नियामक मंडळाची मान्यता आहे.`` (यादी सोबतच्या परिशिष्टानुसार आहे)

(ब) ठराव करण्यांत येतो की, ``लघु पाटबंधारे प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी उद्भव म्हणून गृहीत धरण्यास व पाणी आरक्षणास प्रचलित नियमाच्या अधीन राहून मंजुरी देण्यास नियामक मंडळाची सर्वसाधारण मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/15 :-**

ठराव करण्यांत येतो की, ``महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील दंडणीय दराने येणारी पाणीपट्टी वगळून एकेरी दराने आकारणी करण्यास व पुढील करारनामा करुन घेण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

**ठराव क्र.7/16 :- आयत्या वेळचे विषय**

ठराव करण्यांत येतो की, ``ज्या लघु पाटबंधारे प्रकल्पांची घळभरणी ह्या वर्षी (जून-2000 अखेर) करावयाची आहे आणि हे प्रकल्प शासनाच्या प्रचलित मापदंडात बसत आहेत, अशा प्रकल्पांवर प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा 25 टक्के पर्यंत इतका जास्त खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.``

| | |
|---|---|
| ( पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# परिशिष्ट

## तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

### लघु पाटबंधारे जलाशयातून आरक्षणाचे प्रस्ताव

| अ. क्र. | योजनेचे नांव | पाण्याचा उद्भव | पाणी मागणी द.ल. घ.मी. (सन 2011 अखेर) | ज्ञापन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | 0 ते 15 टक्के पर्यंतचे आरक्षण | | | |
| | जळगांव जिल्हा | | | |
| 1 | टाकळी बु. व खु. पा.पु.यो. ता.जामनेर जि.जळगांव | भागदरा ल.पा. | 0.118 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/962/2000, दि.2/3/2000 |
| 2 | चोरवड पा.पु.यो. ता.पारोळा जि.जळगांव | शिरसमणी ल.पा. | 0.091 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/963/2000, दि.2/3/2000 |
| 3 | मंगरूळ पा.पु.यो. ता.पारोळा जि.जळगांव | म्हसवा ल.पा. | 0.16 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/964/2000, दि.2/3/2001 |
| 4 | विटनेर व 4 गांवे पा.पु.यो. ता.पारोळा जि.जळगांव | म्हसवा ल.पा. | 0.223 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/965/2000, दि.2/3/2000 |
| 5 | रणाईचे पा.पु.यो. ता.अमळनेर जि.जळगांव | निसर्डी ल.पा. | 0.105 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/966/2000, दि.2/3/2000 |
| 6 | मालखेडा पा.पु.यो. ता.जामनेर जि.जळगांव | कळमसरा ल.पा. | 0.081 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/967/2000, दि.2/3/2000 |
| | धुळे जिल्हा | | | |
| 7 | चाकडू पा.पु.यो. ता.शिरपूर जि.धुळे | बुडकी ल.पा. | 0.090 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/968/2000, दि.2/3/2000 |
| 8 | रोहिणी भोईटे पा.पु.यो. ता.शिरपूर जि.धुळे | खामखेडा ल.पा. | 0.30 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/969/2000, दि.2/3/2000 |
| 9 | भामेर व 3 गांवे पा.पु.यो. ता.साक्री, जि.धुळे | छावडी ल.पा. | 0.25 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/970/2000, दि.2/3/2000 |

| अ. क्र. | योजनेचे नांव | पाण्याचा उद्भव | पाणी मागणी द.ल. घ.मी. (सन 2011 अखेर) | ज्ञापन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | **नंदुरबार जिल्हा** | | | |
| | **नाशिक जिल्हा** | | | |
| 10 | नायडोंगरी पा.पु.यो. ता.नांदगांव जि.नाशिक | हातगांव-2 ल.पा. | 0.235 | जा.क्र./मुअ/पापुयो/ तां.6/971/2000, दि.2/3/2000 |
| | **15 ते 25 टक्केपर्यंतचे आरक्षण** | | | |
| | **नंदुरबार जिल्हा** | | | |
| 11 | कोठळी व 4 गांवे पा.पु.यो. ता.जि.नंदुरबार | कोकणीपाडा ल.पा. | 0.33 | |
| | **25 टक्केवरील आरक्षण** | | | |
| | **जळगांव जिल्हा** | | | |
| 12 | गणेशपूर व पाच गांवे पा.पु.यो. ता.चाळीसगांव जि.जळगांव | वलठाण ल.पा. | 0.443 | |
| 13 | तळेगांव व 4 गांवे पा.पु.यो. ता. चाळीसगांव जि.जळगांव | हातगांव-2 ल.पा. | 0.434 | |